डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

(सेवागौरव समारंभ- दि. ३०/०४/२०२४)

परिपत्रक क्र. सा.प्र./२०२४/

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, **१) श्रीमती साळूबाई कचरु भालेराव-माळी, २) श्री.दिलीप दशरथ रोकडे-पहारेकरी, व ३) श्री.के.आर. राऊत-प्रयोगशाळा परिचर** हे नियत वयोमानानुसार दिनांक ३०-०४-२०२४ रोजी विद्यापीठाच्या सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत.

उपरोक्त सेवानिवृत्त होणारे कर्मचारी यांचा सेवागौरव समारंभ मा.कुलगुरु महोदय यांच्या हस्ते दिनांक ३०-०४-२०२४ रोजी सायं. ०४:०० वाजता महात्मा फुले सभागृह, प्रशासकीय इमारतीमध्ये आयोजित करण्यात आलेला आहे.

सबब, सेवागौरव समारंभास सर्वांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

विद्यापीठ प्रांगण,
छत्रपती संभाजीनगर ४३१ ००४
संदर्भः- सा.प्र./२०२४/50
दिनांकः- २६-०४-२०२४

)(
)(
)(
)(

कुलसचिव

या परिपत्रकाची प्रत **कार्यकारी अभियंता**, स्थावर विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन विनंती करण्यात येते की, दि. ३०-०४-२०२४ रोजी सायं. ४.०० वाजता महात्मा फुले सभागृहामध्ये माईक व्यवस्था करण्यासाठी संबंधितास आपल्या स्तरावर आदेशित करावे.

या परिपत्रकाची प्रत **संचालक**, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, सेवागौरव समारंभ आयोजित केल्याबद्दल विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांना SMS द्वारे अवगत करण्यात यावे. तसेच सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावे.

या परिपत्रकाची प्रत **उपकुलसचिव**, आस्थापना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, उपरोक्त सेवागौरव कार्यक्रमाचे सूत्रसंचलन करुन सहकार्य करावे.

कुलसचिव